# निवडणुक प्रचार अभियान डायरी-17.04.2014

**अरुण जेटली**
(विरोधी पक्षनेते, राज्यसभा)

**द्वेषभावपूर्ण नाही न्यायी कामगीरी**

एनडीएचे पंतप्रधानपदाचे उमेदवार श्री नरेंद्र मोदी यांनी दूरदर्शन वृत्तवाहिनी एजन्सी एएनआयला दिलेल्या एका मुलाखतीत महत्तवपूर्ण टिप्पणी केली आहे. त्यांनी सांगितले की आगामी सरकार सकारात्मक कार्यसूचीवर काम करील आणि द्वेषभावनेने काम करणार नाही.

भारतात सत्तापालट होत आहे. प्रतिस्पर्धी पक्षात अस्वस्थता वाढू लागली आहे. जनतेची अपेक्षा वाढत आहे. लोक त्यांच्या जीवनाचा महत्त्वपूर्ण विकास व्हावा अशी अपेक्षा करत आहेत. नवी पिढी, शिक्षण, नोकरी, राहण्यासाठी घर, आरोग्य आणि स्वच्छता यांसाठी आशा लावून बसले आहेत. राजकीय पक्षांदरम्यानच्या वैमनस्याच्या बदल्यात सुशासन यावे अशी अपेक्षा मतदार करत आहेत. अशा परिस्थितीत भविष्यात सरकार त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांविरोधातील लढत किंवा राजकीय लढतीसाठी ओळखले जाणार नाही तर तिच्या कामगिरी आणि सिद्धींमुळे ओळखली जाईल. याचा अर्थ असा नाही की कायद्यानुसार कारवाई करणार नाही. जे लोक गुन्हा करतील, त्यांच्या विरुद्ध तटस्थ स्वतंत्र एजन्सीद्वारे तपास केलाच पाहिजे. संस्थाकीय स्वतंत्रता आणि व्यावसायीकरणाची व्यवस्था केली गेली पाहिजे.एजन्सीने राजकीय हस्तक्षेपाशिवाय स्वतंत्रपणे कामगिरी बजावली पाहिजे. भविष्यातील सरकार अशी खातरी देते.

**मतदार “उल्लू” नाहीत.**

भारतातील जवळपास अर्ध्या भागात 2014 च्या सार्वत्रिक निवडणूकांचे मतदान झाले आहे. 121 संसदीय जागांसाठी मतदान होणार आहे. हा ट्रेंड कसला आहे? तिसरी आघाडीचे जरासुद्धा वर्चस्व दिसून येत नाही. कॉग्रेस शर्यतीत मागे आहे. एनडीए सरकारच्या रचनेची एक वास्तविक संधी मिळण्याची शक्यता दिसून येत आहे. युपिएच्या विरोधात नकारघंटा वाजत आहे. तर दुसरीकडे राष्ट्रीय मूड नरेंद्र मोदी यांच्या बाजूने आहे. सरासरी भारतीय अशी अपेक्षा करित आहेत की, देशाच्या समस्येचा अंत करण्यासाठी स्थिर सरकार कोण आणेल? या प्रश्नाचे उत्तर नक्कीच भाजप आणि एनडीएकडे आहे. राहूल गांधी आणि कॉग्रेसबद्दल जनाक्रोश वाढत आहे ही गोष्ट स्वीकारायलाच हवी. ते “उल्लू(मुर्ख)” नाहीत. म्हणूनच ते कॉग्रेसविरोधात मत देत आहेत. पराजयाची सावली दिसत असताना नेत्यांनी त्यांची शालीनता सोडली नाही पाहिजे. लोक कॉग्रेस विरुद्ध मत देत आहेत त्यासाठी अनेक कारणे जबाबदार आहेत. मतदारांचा आक्रोश हा राहुल गांधींनी सांगितल्याप्रमाणे चार अक्षरांपूरता मर्यादित नाही आहे.